| | |
|---|---|
| MHKO160000382022 | दाखल तारीख - ०८/११/२०२१<br>नोंदणी तारीख - ०७/०१/२०२२<br>निकाल तारीख - १०/०६/२०२६<br>कालावधी - ०३ वर्षे ०७ महिने २२ दिवस |

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ०४/२०२२** **निशानी क्र.**

**भाग अ**

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(i) अन्वये )

**शाहूवाडी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर यांचे न्यायालयात**

( पिठासिन अधिकारी - पी. बी. पवार यांचेसमोर )
न्यायनिर्णय घोषित – दिनांक १०/०६/२०२६
( संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ०४/२०२२ )

गुन्हा नोंद क्र.- २४३/२०२१, शाहुवाडी पो. ठाणे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | :- | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पोलीस निरीक्षक, शाहूवाडी पो. ठाणे,<br>ता. शाहूवाडी, जि. कोल्हापुर |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | :- | सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. व्ही. चिमटे |
| आरोपी | :- | बाबासो शिवाजी पावणे, व.व.५२, धंदा- --,<br>रा.- सोनवडे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | :- | श्री. एस. बी. निरूके |

## भाग ब

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(ii) अन्वये )

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २२/०८/२०२० |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | १०/०९/२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | १२/०६/२०२५ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | १६/०३/२०२६ |
| न्यायनिर्णसाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | १०/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | १०/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक, आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र | आरोपीचे नाव | अटक दिनांक | सी. आर. पी. सी. कलम ४१(अ) (१) प्रमाणे नोटीस | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बाबासो शिवाजी पावणे | आरोपीस फौ.प्र.सं. कलम ४१(अ)(ii) प्रमाणे नोटीस अदा | | भा.दं.वि.सं.कलम २७९,३३७, ३३८ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग क

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(iii) अन्वये )

## अ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | शोभाताई राजाराम पाटील | फिर्यादी | १८ |

## क न्यायालयातर्फे निशाणी -(फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | १ | दोषारोपपत्र |
| २ | नि.१ सोबत | अटकेचे नमुने |
| ३ | नि.१ सोबत | निवेदन |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

## न्यायनिर्णय
## (घोषित दि. १०/०६/२०२६)

१. आरोपीविरूध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४,१३४ब/१८७ अन्वये गुन्हा केल्याचा आरोप ठेवून संपरिक्षित करण्यात आले आहे.

२. अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात अशी की, -

घटना ही दिनांक २२/०८/२०२० रोजी १०.३० वाजणेचे सुमारास साळशी, ता. शाहुवाडी गावचे हद्दीत साळशी ते सोनवडे जाणारे रोडवर अंबीरा ओढ्याजवळ घडली आहे. घटनेचे वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताबेतील होंडा शाईन मो.सा.क्र. एम.एच.०९डी.वाय.१३९५ हे वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे, चालवून रस्त्याला पडलेल्या खड्ड्यात सदर गाडी घातलेने अपघात झाला. सदर अपघातात मोटरसायकलचे पाठीमागे बसलेल्या शोभाताई राजाराम पाटील या खाली पडल्या व जखमी झाल्या. त्यानंतर फिर्यादी शोभाताई पाटील यांनी यांनी सदर अपघाताबाबत सरकारतर्फे शाहूवाडी पो. ठाणे येथे आरोपीविरुध्द फिर्याद दिलेली आहे.

३. फिर्यादी यांनी दाखल केलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरूध्द शाहूवाडी पो. ठाणे येथे गु.र.नं.२४३/२०२१ हा दाखल होवून त्याचा तपास श्री. एस. व्ही. पाटील, तत्कालीन पो.हे.कॉ.६५२, शाहुवाडी पो. ठाणे यांचेकडे वर्ग झाला होता. तपासअधिकारी यांनी तपासादरम्यान साक्षीदारांचे जाबजबाब घेतले, तसेच घटनास्थळाचा पंचनामा केला, वैदयकीय व अन्य कागदपत्रे प्राप्त करुन तपासाअंती आरोपीविरूध्द पुरेसा पुरावा उपलब्ध झाल्यानंतर त्याचेविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

४. यापूर्वी मी आरोपीविरूध्द निशानी ०९ येथे गुन्हयाचा तपसिल निश्चित केला आहे, आरोपीस तो तपशिल वाचून, समजावून सांगितला असता त्यांनी अपराधाची कबूली दिली नाही आणि संपरिक्षेची तयारी दर्शविली. तसेच आरोपीविरूध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर न आलेने त्याचा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आलेला नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

५. अभियोग पक्षाचा खटला, अभिलेखावरील पुरावा यावरून माझे विचारार्थ खालील मुद्दे आले आहेत व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | आरोपीने दिनांक २२/०८/२०२० रोजी १०.३० वाजणेचे सुमारास साळशी, ता. शाहुवाडी गावचे हद्दीत साळशी ते सोनवडे जाणारे रोडवर अंबीरा ओढ्याजवळ त्याचे ताबेतील होंडा शाईन मो.सा.क्र. एम.एच.०९डी.वाय.१३९५ हे वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून, जेणेकरुन मानवी जीवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंचा हयगयीने चालविले आणि त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम **२७९** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| २ | आरोपीने वरील नमूद दिनांक वेळी व ठिकाणी त्याचे ताबेतील होंडा शाईन मो.सा.क्र. एम.एच.०९डी.वाय.१३९५ हे वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे, चालवून रस्त्याला पडलेल्या खड्यात गाडी घालून मोटरसायकलचे पाठीमागे बसलेल्या शोभाताई राजाराम पाटील यांना खाली पाडून त्यांना जखमी करणेस कारणीभूत झाला आणि त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम **३३७** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी. |
| ३ | आरोपीने वरील नमूद दिनांक वेळी व ठिकाणी त्याचे ताबेतील होंडा शाईन मो.सा.क्र. एम.एच.०९डी.वाय.१३९५ हे वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे, चालवून रस्त्याला पडलेल्या खड्यात गाडी घालून मोटरसायकलचे पाठीमागे बसलेल्या शोभाताई राजाराम पाटील यांना खाली पाडून त्यांचे डोकीस, उजवे कानाजवळ गंभीर दुखापत करणेस कारणीभूत झाला आणि त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम **३३८** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी. |
| ४ | आदेश काय | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA सत्यमेव जयते

## <u>कारणमिंमासा</u>

## <u>मुददा क्र. १ ते ४ करीता -</u>

६. सदरकामी अभियोग पक्षातर्फे एका साक्षीदाराची साक्ष नोंदविलेली आहे. साक्षीदार क्र. १ शोभाताई राजाराम पाटील या फिर्यादी व अपघाताचे घटनेतील जखमी असून तिने तिचे साक्षीमध्ये कथन केले की घटना रक्षाबंधन दिवशी सकाळी दहा वा.चे

सुमारास साळशी येथे घडली, याव्यतिरिक्त तिला काही आठवत नाही. सदर साक्षीदाराने फिर्यादीवरील तिची सही नि.१९ ओळखली, मात्र त्यातील मजकूर त्यास माहित नसल्याचे कथन केले. सरकारी वकिलांचे उलटतपासात सदर साक्षीदाराने दि.२२/०८/२०२१ रोजी तथाकथित अपघाताचे वेळी ती आरोपीचे मोटरसायकलवरून जात असताना हंबीरा पुलाजवळ घटना घडल्याचे कबूल केले, तथापि आरोपीसोबत मोटरसायकलचे पाठीमागे बसून जात असताना सदर मोटरसायकल खड्ड्यामध्ये गेली व अपघात होऊन ती रस्त्यावर पडली व तिला डोक्याला, कानाला मार लागून ती जखमी झाली व बेशुध्द पडली ही बाब पूर्णपणे नाकारली. तसेच उलटतपासात सदर फिर्यादीने ती सिध्दार्थ हॉस्पीटल, कोल्हापूर येथे ॲडमिट होती व दि.२४/०८/२०२१ रोजी शुध्दीवर आली असे कथन केले, तथापि हॉस्पीटलमधून डिसचार्ज मिळाल्यावर दि.०८/०९/२०२१ रोजी आरोपीविरूध्द सदर अपघाताचे घटनेबाबत फिर्याद दिल्याची बाब पूर्णपणे नाकारली. तसेच उलटतपासात फिर्यादीने पुढे कथन केले की सदर घटनेबाबत तिचे व आरोपीमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड होवून वाद मिटला आहे. इतर विचारलेल्या सर्व उत्तरसूचक प्रश्नांची फिर्यादीने नकारार्थी उत्तरे दिली.

DISTRICT COURTS MAHARASHTRA सत्यमेव जयते

७. अभियोग पक्षाने सदरकामी अन्य कोणताही साक्षीदार तपासलेला नाही. अभियोग पक्षाचा फिर्यादी साक्षीदार क्र. १ हीने तिचे जबाबात अपघात झाल्याची बाब कबूल केली असून आरोपीसोबत त्याचे दुचाकी वाहनावरून जात असताना अपघात झाला व ती जखमी झाल्याची बाब पूर्णपणे नाकारली आहे. तसेच सदर साक्षीदाराने तिचे उलटतपासात तिला दि.२४/०८/२०२१ रोजी ती शुध्दीवर आली असे कथन केले आहे, तथापि दि.०८/०९/२०२१ रोजी आरोपीविरूध्द तिने फिर्याद दिल्याची बाब पूर्णपणे नाकारली आहे. तसेच उलटतपासात सदर साक्षीदाराने कथन केले की सदर घटनेबाबत तिचे व आरोपीमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड होवून वाद मिटला आहे. सबब, सदर साक्षीदाराचे साक्षीमधून अभियोग पक्षास कोणतीही मदत झालेली नाही. एकूणच, सदर साक्षीदाराचे साक्षीमधून घटनेचे वेळी आरोपीने तथाकथित दुचाकी वाहनावर फिर्यादीस बसवून घेऊन जाताना घटनास्थळी अपघात झाला व सदर अपघातात आरोपीची चुकी होती याबाबत कोणताही संयुक्तिक पुरावा आरोपीविरूध्द दिसून येत नाही. अभियोग पक्षाने सदरकामी

तपासी अधिकारी अथवा अन्य कोणत्याही प्रत्यक्षदर्शी वा अनुशंगिक साक्षीदारास तपासलेले नाही. तसेच अभियोग पक्षाने कोणताही पंच साक्षीदार सदरकामी न तपासलेने पंचनामा देखिल शाबित झालेला नाही. तसेच सदर घटनेचा अन्य कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अभिलेखावरील पुराव्यावरून दिसून येत नाही. अभिलेखावरील पुरावा अपूरा असून त्यावरून अपघाताची घटना नेमकी कशी घडली व सदर अपघातात आरोपीची चुकी होती किंवा कसे याचा खुलासा होत नाही. अभिलेखावरील पुराव्यावरून आरोपीविरूध्द कोणतीही गुन्हादर्शक बाब शाबित होत नाही. तसेच अभियोग पक्षास सदरकामी पुरेशी संधी देऊन देखिल त्यांनी सदरकामी अन्य कोणताही साक्षीदार न तपासलेने त्यांचा पुरावा बंद करण्यात आला आहे. सबब, अभिलेखावरील साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता अपघाताच्या घटनेच्या वेळी आरोपीने त्याचे ताबेतील होंडा शाईन मो.सा.क्र. एम.एच.०९डी.वाय.१३९५ हे वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे, चालवून रस्त्याला पडलेल्या खड्यात गाडी घालून मोटरसायकलचे पाठीमागे बसलेल्या शोभाताई राजाराम पाटील यांना खाली पाडून अपघात केला व सदर अपघाता तिचे डोकीस, उजवे कानाजवळ गंभीर दुखापत झाली याबाबत आरोपीविरूध्द कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब, आरोपीविरूध्द ठेवण्यात आलेले दोषारोपाबाबत त्यास सबळ पुराव्यानिशी निर्विवादपणे दोषी ठरविता येईल इतपत पुरावा अभिलेखावर न आलेने आरोपीस सदरकामी दोषी ठरवता येत नाही व त्यास संशयाचा फायदा देण्यात येत आहे.

८. सबब, अभियोग पक्षाचे अभिलेखावरील पुराव्यावरून आरोपीविरूध्दचा ठेवलेला गुन्हयाचा मजकुर हा शाबित होत नसलेने आरोपी प्रस्तुत गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब वर नमूद चर्चेस अनुसरून मी मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी असा नोंदवित आहे आणि मुद्दा क्र. ४ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपी बाबासो शिवाजी पावणे यांची भारतीय दंड संहिता १८६० चे कलम २७९,३३७,३३८ या गुन्हयातुन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) नुसार निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

२. आरोपीचा जामीनकदबा रदद करणेत येवुन त्याला स्वांतत्र्य देण्यात येत आहे.

३. आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१अ प्रमाणे जामीन दयावा.

(खुल्या न्यायालयात घोषीत)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Pankaj Bhimrao Pawar

**स्थळ - शाहूवाडी**
**दिनांक – १०/०६/२०२६**

**( पी. बी. पवार )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**मलकापुर-शाहूवाडी, जि. कोल्हापुर**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | P. A. Vasudeo |
| Name of Court | P. B. Pawar, C.J.J.D & J.M.F.C. Malkapur-Shahuwadi |
| Date of Dictation | 10/06/2026 |
| Judgment signed by the P.O.on | 10/06/2026 |
| Judgment uploaded on | 10/06/2026 |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते